**MHKO100007802015**

संक्षिप्त फौ. खटला क्र.३६५/२०१५ निशाणी ९१ वर आदेश
**( संतान बार्देस्कर वि. विठ्ठल इंजल)**

अर्ज व त्यावर आरोपीने दाखल केलेले म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. आरोपीतर्फे साक्षीदार क्र.१ विकास कांबळे यांची साक्ष आरोपीने निशाणी ७७ वर दाखल केले अर्जावरील आदेशानुसार नोंदविण्यात आली आहे. तो अर्ज आरोपीने वर्णन यादी निशाणी क्र. ५२ अ.क्र. १ वरील धनादेश क्र. ०००००६, ००००००८ ते ०००००१५ हरवलेबाबत दिलेली तक्रार सिद्ध करण्याकरीता दिला होता. त्यानुसार सदर साक्षीदाराची साक्ष नोदविण्यात आली आहे. तो तक्रार अर्ज त्यांच्या बॅंकेत मिळाला नाही असे त्या साक्षीदाराने सरतपासात कथन केले आहे.

२. वादातील धनादेश निशाणी ५३ हा ०००००६ असून इतर धनादेश या प्रकरणाचा भाग नाहीत. साक्षीदार विकास कांबळे यांनी उलटतपासात विचारण्यात आलेल्या प्रश्नांना उत्तर देताना असे कथन केले की, धनादेश क्र.०००००१ ते ०००००५ व ०००००७ हरवले किंवा वटले हे त्यांना त्यांच्या संगणकावरील अभिलेख पाहून सांगता येईल. तसे स्टेटमेंट हजर करण्यास सांगितले तर ते हजर करू शकतात. परतु धनादेश क्र. ०००००१ ते ०००००५ व ०००००७ या प्रकरणाशी संबंधीत नाहीत. म्हणून साक्षीदारास त्याबाबत अहवाल हजर करण्याचे निर्देश देणे हे प्रकरण निकाली काढण्यासाठी गरजेचे नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
DHANASHRI
MAHADEV PAWAR
Date: 2025.12.24
13:42:19 +0530

दिनांक २३.१२.२०२५
गडहिंग्लज

डी. एम. पवार
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(कोर्ट क्र.२), गडहिंग्लज